CNR No. MHRG040057602025

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | २१/११/२०२५ |
| नोंदणी तारीख | : | ११/१२/२०२५ |
| निकाल तारीख | : | ३१/०३/२०२६ |
| कालावधी | : | ०० व. ०४ म. १० दि. |

**<u>२ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, पनवेल यांचे न्यायालयात, पनवेल,</u>**
**जिल्हा - रायगड**
**(पिठासीन अधिकारी : ए.एस. बडगुजर)**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१७५५/२०२५**
**निशाणी क्र.१४/ब**

१. **साहिल रमण आनंद**
वय- ४३ वर्षे, कामधंदा- नोकरी,
रा. ३९०३/३९०४, द पार्क रेसिडेन्सीज,
ओशिवरा पार्क व्हयु सी.एच.एस.एल,
लिंक रोड एक्सटन जवळ, अंधेरी पश्चिम,
आझाद नगर, मुंबई - ४०००५३,

२. **युक्ती रमन आनंद**
वय- ३९ वर्षे, कामधंदा- नोकरी,
रा. ३९०३/३९०४, द पार्क रेसिडेन्सीज,
ओशिवरा पार्क व्हयु सी.एच.एस.एल,
लिंक रोड एक्सटन जवळ, अंधेरी पश्चिम,
आझाद नगर, मुंबई - ४०००५३, **... <u>अर्जदार</u>**

**विरूध्द**

कोणीही नाही **... <u>सामनेवाले</u>**

.................................................................................
अर्जदारांतर्फे विधिज्ञ – शुभांगी केदार लाड.
.................................................................................

**- <u>न्यायनिर्णय</u> -**
**(घोषित दिनांक ३१/०३/२०२६)**

प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला मिळणेकरीता अर्जदारांनी दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार क्र.१ व २ यांची आई संजु रमन आनंद या दिनांक १८/०३/२००९ रोजी बी-१४०२, केसर हार्मोनी, सेक्टर – ०६, खारघर, नवी मुंबई येथे मयत झाल्या. मयत संजु रमन आनंद यांचे पती व अर्जदार क्र.१ व २ यांचे वडील रमन जगन्नाथ आनंद हे दिनांक १८/०१/२००० रोजी मयत झाले आहेत. मयत संजु रमन आनंद यांच्या पश्चात अर्जदार क्र.१ व २ हेच कायदेशीर वारस आहेत. मयत संजु रमन आनंद व अर्जदार क्र.१ यांच्या संयुक्त मालकीच्या सदनिका क्र.७०२, सातवा मजला, साई साक्षात, ए विंग, प्लॉट नं.९, सेक्टर – ०६, खारघर, नवी मुंबई व सदनिका क्र.७०३, सातवा मजला, साई साक्षात, ए विंग, प्लॉट नं.९, सेक्टर – ०६, खारघर, नवी मुंबई या मिळकती आहेत.

३. अर्जदार क्र.१ यांनी त्यांचे साक्ष शपथपत्र निशाणी क्र.८ अन्वये दाखल केले आहे. त्यांनी त्यामध्ये अर्जात सांगितलेल्या बाबी नमुद केल्या आहेत. अर्जदार यांनी अभिलेखावर यादी निशाणी क्र.४ अन्वये अर्जदार यांच्या आधारकार्डची प्रत, मयत संजु रमन आनंद यांच्या मृत्यू दाखल्याची प्रत, मयत रमण जगन्नाथ आनंद यांचे मृत्यू प्रमाणपत्र, खरेदीखतांच्या प्रती अशी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. अर्जदार यांनी निशाणी क्र.१३ अन्वये पुरावा बंद पुरशीस दाखल केली आहे.

४. प्रस्तुत अर्जाबाबत "दैनिक रायगड नगरी" या वर्तमानपत्रात जाहीर नोटीस दिनांक ०२/०१/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. न्यायालयीन बेलीफ मार्फत केलेला जाहीरनामा व त्याचा अहवाल, दवंडीपावती निशाणी क्र.७ वर आहे. प्रस्तुत अर्जाला दिलेल्या मुदतीत ते आजतागायत कोणीही हरकत घेतलेली नाही.

५. कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसते की, अर्जदार हे मयत संजु रमन आनंद यांचे कायदेशीर वारस आहेत.

६. वरील परिस्थिती पाहता असे म्हणावे लागेल की, या प्रकरणामध्ये अर्जदार हे मयत संजु रमन आनंद यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्जदार हे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. करिता खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**: आदेश :**

१. अर्जदार क्र.१ साहिल रमण आनंद व अर्जदार क्र.२ युक्ती रमन आनंद हे मयत संजु रमन आनंद यांचे कायदेशीर वारस आहेत.

२. अर्जदार क्र.१ साहिल रमण आनंद व अर्जदार क्र.२ युक्ती रमन आनंद यांना वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) नियमानुसार स्टॅम्प डयुटी आकारून निर्गमित करण्यात यावे.

ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Digitally signed by ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Date: 2026.03.31 18:50:03 +0530

पनवेल
दिनांक : ३१/०३/२०२६.

**(ए.एस. बडगुजर)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
पनवेल.